रे.दि.मु.नं. १७२/२०१५ नि. ५ वरील आदेश

नवनाथ वै. ४ वि. आबा

आदेश

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाण दाखल केलेला आहे. या अर्जाद्वारे प्रतिवादीने अगर त्यांचे तर्फे कोणीही वादींचे दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत करु नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**,

प्रस्तुतचा दावा खालील मिळकती बाबत दाखल करण्यात आलेला आहे.

१(अ) मौजे शेवरी ता. माण, जि. सातारा येथील जमिन गट नं. ५१६ यांचे क्षेत्र ०७ हेक्टर ०२ आर पैकी वादी १ ते ४ यांचे मालकी वहिवाटीचे क्षेत्र् ०५ हेक्टर ९० आर. सदर दावा मिळकतीचा सर्व्हे नं. १५५ होता त्याचे गटापुर्वीचे वर्णन खालीलप्रमाणे

सर्व्हे नं.	पोट हिस्सा	क्षेत्र् हे. आर	आकार रु. पैसे	मालक / कब्जेदार नाव
१५५	१	१.३५	०.२९	रामू सखाराम हिरवे
	२अ	१.८९	०.२५	रंगनाथ यशवंत अवघडे
	२ब	१.८९	०.२९	शंकर रामा अवघडे
	२क	१.३९	०.२०	एकनाथ मारुती अहिवळे
	२ड	०.७४	०.०७	शकुंतला सुदाम माने

३ दावा मिळकतीचा मुळ सर्व्हे क्र. १५५ क्षेत्र ७ हेक्टर २ आर होता. या मिळकतीचे मुळ मालक बापू सुभाना दडस हे होते ते वादींचे आजोबा म्हणजे आईचे वडील

होते. प्रस्तुत दावा मिळकती व सर्व्हे क्र. १५०, १५६, १५७ या बापू दडस यांच्या मालकीच्या होत्या. या मिळकतींच्या अधिकार अभिलेखात रामू सखाराम हिरवे हे साधे कुळ होते अशी नोंद आहे. परंतु ते प्रत्यक्षात या मिळकतीचे कुळ नव्हते. ते प्रतिवादीचे वडील आहेत. तरी देखील त्यांच्या नावाची कुळ म्हणून नोंद असल्याने त्यांच्या कब्जात सिव्हील कायद्याच्या तरतुदीप्रमाणे अतिरिक्त जमिन असल्याचे दिसून आले. अशा प्रकारे सर्व्हे क्र. १५५ पैकी १४ एकर २४ गुंठे क्षेत्र शासनामार्फत अतिरिक्त ठरविण्यात आली. त्यापैकी वादी क्र. १ चे वडील रंगनाथ यशवंत अवघडे यांना सर्व्हे क्र. १५५/ २अ क्षेत्र् १ हेक्टर ८९ आर, वादी क्र. २ यांना सर्व्हे क्र.१५५/२ब क्षेत्र १ हेक्टर ८९ आर, वादी क्र. ३ चे वडील एकनाथ मारुती अहिवळे यांना सर्व्हे क्र.१५५/२क क्षेत्र १ हेक्टर ३८ आर व वादी क्र. ४ यांनी ज्यांच्याकडून दावा मिळकत १५५/२ड क्षेत्र ०.७४ आर खरेदी केले त्यांना म्हणजे शकुंतला सुदाम माने यांना प्राप्त झाले. त्या बाबत अनुक्रमे फेरफार क्र. २३३७, २३३८, २३३९ व २३४० तयार झाले. या सर्वांना या मिळकती कब्जेपट्टीप्रमाणे प्राप्त झाल्या. त्या प्रमाणे सन १९७६ पासून दावा मिळकतींच्या मालकी हक्कात त्यांच्या मालकीप्रमाणे नोंदी झाल्या.

४. शकुंतला सुदाम माने व त्यांचे कुटुंबिय यांनी दावा मिळकत सर्व्हे क्र. १५५/२ड वादी क्र. ४ यांना दिनांक १८/०८/२०१० रोजी नोंदणीकृत खरेदीखताने विक्री केली. या मिळकती मध्ये वादी नं. ४ व त्याचे कुटुंबियांनी सुधारणा केलेली आहे.

५. प्रतिवादीस दावा मिळकती खरेदी करण्याची इच्छा असल्याने त्याने स्वार्थापोटी वादींना मानसिक त्रास देणेसाठी वेगवेगळया तक्रारी करण्यास सुरवात केली. प्रतिवादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना तो वादींच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत असतो. सबब प्रतिवादीने अशा प्रकारे हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हूकूम देण्यात यावा.

६. प्रतिवादीने दाव्यात हजर होवून आपली कैफियत व प्रस्तुत अर्जावरील

म्हणणे निशाणी क्र. ३० वर दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर थोडक्यात खालीलप्रमाणे

दावा मिळकतीशी वादींचा काहीही संबंध नाही. वास्तवीक दावा मिळकती या प्रतिवादीच्या वडिलोपार्जित कुळ हक्काच्या जमिनी आहेत. या मिळकतीचा जुना सर्व्हे क्र. १५५ असून त्याचे गट क्र. ५१६ होवून पोट हिस्से पडलेले आहेत. सदरचे पोट हिस्से चुकीचे आहेत. दावा मिळकतींबाबत तहसिलदार माण यांचे पुढे प्रकरण चालून प्रतिवादीच्या बाजूने निकाल झालेला आहे. शासनाने सन १९७५ साली मुळ मालक बाबू सुभाना दडस यांचे क्षेत्र अतिरिक्त ठरवलेले आहे. वास्तवीक रामू सखाराम हिरवे यांचे क्षेत्र अतिरिक्त ठरवलेले नाही. तसेच अतिरिक्त ठरवलेले क्षेत्र कुळकायद्याच्या तरतुदीप्रमाणे काढून घेतलेले नाही. प्रस्तुत मिळकतीबाबत वडूज येथील न्यायालयात दावा दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे.

७. वादी हे कधीही दावा मिळकतीत आलेले नाहीत. त्यांनी दावा मिळकतीची वहिवाट केलेली नाही. प्रतिवादीचे वडीलांपासून प्रतिवादीची वहिवाट कायम आहे. ७/१२ चे उता–यावरील पोकळ नोंदीच्या आधारे वादीला दावा मिळकतीत हक्क प्राप्त होत नाहीत. प्रतिवादीचे कुळ हक्क कायम असून ते कधीही रद्द झालेले नाहीत. दावा मिळकतीपैकी गट क्र. १५५ /२ड ची वादी क्र. ४ च्या हक्कात झालेली विक्री बेकायदेशिर आहे. त्या बाबत शासनाची परवानगी घेण्यात आलेली नाही. या विक्रीच्या व्यवहाराबाबत तयार झालेला फेरफार क्र. १५९० बाबत प्रतिवादीने वाद उपस्थित केलेला होता. त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी माण – खटाव यांनी त्याबाबत फेर चौकशीचे आदेश दिलेले आहेत. ही बाब वादींनी न्यायालयापुढे नमूद केलेली नाही. दावा मिळकतीबाबत प्रतिवादीने वादीं विरुध्द तहसिलदार यांच्यापुढे कुळ असल्याबाबत प्रकरण दाखल केले होते. त्याबाबत निकाल झालेला आहे. या निकाला आधारे प्रतिवादी वादीस दावा जमिनीत येवू देणार नाहीत यामुळे प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. सबब वरील सर्व कारणास्तव अर्ज रद्द करण्यात यावा.

८. वादीतर्फे विद्वान वकील श्री. के.डी.भासले यांचा तर प्रतिवादीतर्फे विद्वान

वकील श्री. बी.ए.सावंत यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१	प्रथमदर्शनी केस वादीच्या लाभात आहे काय ?	होय
२	न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे काय ?	होय
३	अर्ज नामंजूर केला तर वादीचे भरुन न येणारे नुकसान होणार आहे काय ?	होय
४	आदेश काय ?	अर्ज मंजूर करण्यात येतो.

कारणमिमांसा

९. दोन्ही पक्षांनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ वेगवेगळी कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्याचा उहापोह योग्य ठिकाणी केलेला आहे

मुददा क्र. १ ते ३ बाबत

१०. सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने ते विवचनासाठी एकत्रीत घेणत आलेले आहेत.

११. विद्वान वकील श्री. भोसले यांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकतीवर वादींचा आपापल्या हिश्याप्रमाणे कब्जा आहे. अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन रामा हिरवे कुळ असलेल्या जमिनीवर बाबू दडस याची मालकी होती. तो कुळ असलेल्या जमिनी सिलींग कायद्याप्रमाणे जादा झाल्या होत्या व त्या वादींना वाटून देण्यात आलेल्या होत्या ही बाब स्पष्ट होते. दावा मिळकतीच्या अधिकारअभिलेखात पुर्वी पासून वादींच्या नावाच्या नोंदी आहेत. त्या कायम आहेत. ही अभिलेखे प्रतिवादीने कधीही आव्हानीत

केलेली नाहीत. त्यामुळे वादींचा दावा मिळकतीवर कब्जा आहे ही बाब स्पष्ट होते.

१२. विद्वान वकील श्री. सावंत यांनी युक्तीवाद केला की दावा मिळकतीवर प्रतिवादीचे वडील रामा कुळ होते या बाबत कोणताही वाद नाही. अशा प्रकारे कुळ म्हणून दावा मिळकतीवरील त्यांचा कब्जा काढून घेण्यात आलेला आहे. असे दर्शविणा–या कोणत्याही बाबी अभिलेखावर दाखल नाहीत. फेरफार व जमिनीचा कब्जा एकाच दिवशी झाल्याचे दिसून येते. यावरुन कब्जा हस्तांतरित झाला नाही ही बाब स्पष्ट होते. त्याचप्रमाणे मंडल निरिक्षक यांना कब्जा काढून देण्याची अधिकारिता नाही. त्यामुळे दावा मिळकतीवर वादींचा कब्जा नाही असे दिसून येते.

१३. फेरफार क्र. २३३५ नि. क्र. ७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सभापती, अतिरिकत भु निर्धारण न्यायाधिकरण, यांच्या आदेशाप्रमाणे बाबू सुभाना दडस कुळ रामू सखाराम हिरवे यांच्या कब्जातील जमिन सर्व्हे क्र. १५५ पैकी दक्षिणेकडील १४ एकर २४ गुंठे ही जमिन अतिरिक्त ठरवण्यात आली होती. सदरचा फेरफार हा दिनांक २७/२/१९७६ रोजी पारित झालेला आहे. हा फेरफार रद्द झालेला आहे असे दर्शविणा–या कोणत्याही बाबी अभिलेखावर आलेल्या नाहीत. या संदर्भात प्रतिवादीने वडूज येथील न्यायालयात दावा दाखल केल्याचे प्रतिवादींनी दाखल केलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. १५८/२०१५ च्या वादपत्रावरुन दिसून येते. परंतु त्यात केवळ निरंतर मनाई हुकूमाची मागणी केलेंली आहे. या फेरफारानुसार संपुष्टात आलेल्या अधिकारांबाबत प्रत्यक्ष कोणतीही दाद मागितलेली नाही.

१४. प्रतिवादीने वादी क्र. ४ आवडाबाई हिने शकुंतला सुदाम माने हिच्या कडून दावा मिळकतीपैकी काही भाग खरेदी केल्याबाबत फेरफार क्र. १५९० बाबत वाद उपस्थित केल्याचे उपविभागीय अधिकारी यांच्या समोरील आर टी एस अपील क्र. ८७/१७१/२०१२ या वरुन दिसून येते. परंतु उपविभागीय अधिकारी यांनी ते अपील अंतिमतः निकाली न काढता पुर्नचौकशीसाठी तहसिलदार यांच्याकडे पाठविलेले आहे. यावरुन त्याबाबत अंतिम निकाल झालेला नाही ही बाब स्पष्ट होते.

१५. त्याचप्रमाणे प्रतिवादीने तहसिलदार यांच्या पुढील ३२ ग केस क्र. एस आर ११/२०13 मधील निकालाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. यावरुन सामनेवाला यांची दावा मिळकतीवर असलेली मालकी हक्कातील नावे कमी करुन दावा मिळकत प्रतिवादीच्या नावे कुळ खरेदीदार म्हणून विक्री करण्यात येईल असा आदेश त्यात दिल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे त्या प्रकरणात यातील वादी सामनेवाला असल्याचे दिसून येते. तसेच यातील दावा मिळकती त्यात समाविष्ट असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीत प्राप्त परिस्थितीमध्ये दावा मिळकती खरेदी करायचा आदेश प्रतिवादीच्या लाभात झाल्याचे दिसून येते. वास्तविक वादीने दाखल केलेल्या या आदेशा विरुध्द अपील क्र. ५/२०१५ मधील रोजनाम्याच्या झेरॉक्स प्रतिप्रमाणे सदर आदेशावरील स्टे हुकूम रद्द झाल्याचे परंतु आहे तशी परिस्थितीत कायम ठेवण्याचे आदेशीत झाल्याचे दिसून येते.

१६. प्राप्त परिस्थितीत बापू दडस मालक असलेली व रामा हिरवे कुळ असलेली जमिन अतिरिक्त झाली नव्हती असे दर्शविणा–या कोणत्याही बाबी अभिलेखावर नाहीत. तहसिलदार यांच्या आदेशाप्रमाणे प्रतिवादीस दावा मिळकती खरेदी करण्याचा अधिकार प्राप्त झाला म्हणून दावा मिळकती अतिरिक्त झाल्या नव्हत्या असे अनुमान काढता येणार नाही. प्रस्तुतच्या जमिनी जादा आहेत असे न्यायाधिकरणाने ठरविलेले होते. न्यायाधिकरणाचा तो आदेश अदयाप पावेतो कोठेही आव्हानीत केलेला नाही. त्यामुळे तो आदेश कायम आहे.

१७. दावा मिळकतीत वादींना मालकी प्राप्त झाली काय हे पाहणे आवश्यक आहे. गट क्र. ५१६ चा ७/१२ चा उतारा नि. क्र. ६ चे अवलोकन केले असता त्यावर मालकी हक्कात वादी नं. १ चे वडील रंगनाथ, वादी क्र.२, वादी क्र. ३ व वादी क्र. ४ यांच्या नावाच्या नोंदी असल्याचे दिसून येते.

१८. फेरफार क्र. २३३७ नि. क्र. ८ वरुन रामू हिरवे यांच्या ताब्यातून रंगनाथ अवघडे याच्या ताब्यात सर्व्हे क्र. १५५/२अ मधील मिळकत १ हेक्टर ८९ आर दिल्याचे

दिसून येते. त्या बाबत कब्जे पट्टी दिनाक १९/५/१९७६ रोजी झाल्याचे व त्याच दिवशी फेरफार मंजूर झाल्याचे दिसून येते.

१९. फेरफार क्र. २३३८ नि. क्र. ९ वरुन रामू हिरवे यांच्या ताब्यातून शंकर रामा अवघडे याच्या ताब्यात सर्व्हे क्र. १५५/२ब क्षेत्र १ हेक्टर ८९ आर मधील मिळकत दिल्याचे दिसून येते. त्या बाबत कब्जे पट्टी दिनाक १९/५/१९७६ रोजी झाल्याचे व त्याच दिवशी फेरफार मंजूर झाल्याचे दिसून येते.

२०. फेरफार क्र. २३३९ नि. क्र. १० वरुन रामू हिरवे यांच्या ताब्यातून एकनाथ मारुती अहिवळे याच्या ताब्यात सर्व्हे क्र. १५५/२क क्षेत्र १ हेक्टर ३८ आर मधील मिळकत दिल्याचे दिसून येते. त्या बाबत कब्जे पट्टी दिनाक १९/५/१९७६ रोजी झाल्याचे व त्याच दिवशी फेरफार मंजूर झाल्याचे दिसून येते.

२१. फेरफार क्र. २३४० नि. क्र. ११ वरुन रामू हिरवे यांच्या ताब्यातून शकुंतला सुदाम माने यांच्या ताब्यात सर्व्हे क्र. १५५/२ब क्षेत्र १ हेक्टर ३७ आर मधील मिळकत दिल्याचे दिसून येते. त्या बाबत कब्जे पट्टी दिनाक १९/५/१९७६ रोजी झाल्याचे व त्याच दिवशी फेरफार मंजूर झाल्याचे दिसून येते.

२२. वर नमूद फेरफारातील नोंदी व कब्जाची देवाण घेवाण एकाच दिवशी झाल्याचे दिसून येते. परंतु केवळ या नोंदी एकाच दिवशी झाल्या म्हणून त्या बाबत अविश्वास दाखविता येणार नाही. या नोंदी सन १९७६ सालातील आहेत. आदयाप पावेतो या नोंदीबाबत प्रतिवादीने कोणताही वाद उपस्थित केल्याचे दिसून येत नाही. वास्तवीक ज्या वेळी या नोंदीप्रमाणे प्रतिवादीच्या वडीलांचा मिळकतीवरील कब्जा काढून दुस–या लोकांचा कब्जा देण्यात येतो त्या वेळी प्रतिवादीचे वडीलांनी त्या बाबत त्वरीत आक्षेप घेणे आवश्यक होते. या फेरफारामध्ये कब्जेपट्टी प्रमाणे कब्जा हस्तांतरीत झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे वादींचा कब्जा केवळ फेरफारातील नोंदीप्रमाणे आलेला नसून कब्जेपट्टीप्रमाणे आलेला आहे. अधिकार अभिलेखातील नोंदी जो पर्यंत चुकीच्या

आहेत असे ठरत नाही तो पर्यंत त्या नोंदी योग्य आहेत असे गृहीत धरावे लागते. अशा परिस्थितीत वरील फेरफारातील नोंदी व त्याप्रमाणे दावा मिळकतींच्या अधिकार अभिलेखात वादींच्या नावे झालेल्या नोंदी या योग्य आहेत असे अनुमान काढावे लागेल.

२३. वादी क्र. ४ आवडाबाई हिने फेरफार क्र. १५९० प्रमाणे तिच्या नावावरील मिळकत खरेदी केल्याचे दिसून येते. हा फेरफार देखील बेकायदेशिर आहे असे अदयाप सक्षम न्यायाधिकरणाने ठरविलेले नाही.

२४. सर्व्हे क्र. १५५/१ चा सन १९९२-१९९३ चा ७/१२ उतारा पाहिला असता त्यावर भोगवटादार हक्कात बाबू दडस व इतर हक्कात कुळ म्हणून रामू हिरवे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. सर्व्हे क्र. १५५ /२ अ चा सन १९८२-१९८३ सालातील ७/१२ चे उता-याचे अवलोकन केले असता त्यावर भोगवटादार म्हणून रंगनाथ यशवंत अवघडे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते. याच सालातील सर्व्हे क्र. १५५/२ब च्या उता-याचे अवलोकन केले असता शंकर अवघडे यांच्या नावाची भोगवटादार सदरी नोंद असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे सर्व्हे क्र. १५५ /२क च्या ७/१२ च्या उता-याच्या भोगवटादार सदरी सन १९८२-१९८३ साली एकनाथ मारुती अहिवळे यांच्या नावाची नोंद दिसून येते त्याचप्रमाणे याच वर्षी सर्व्हे क्र. १५५/२ड च्या ७/१२ च्या उता-यावरुन याच साली शकुंतला सुदाम माने यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

२५. वादीतर्फे गट क्र. ५१६ चा १९८४ ते १९९६ या कालावधीतील ७/१२ चा उतारा दाखल करण्यात आलेला आहे. यात भोगवटदार सदरी रंगनाथ अवघडे, शंकर अवघडे, शकुंतला माने, एकनाथ अहिवळे यांच्या नावाच्या नोंदी असल्याचे दिसून येते.

२६. प्रतिवादीतर्फे फेरफार क्र. २५६०/४१ दाखल केलेला आहे. यामध्ये सर्व्हे क्र. १५५ हिस्सा क्र. १ ते ४ हे अनुक्रमे एकनाथ अहिवळे, शंकर अहिवळे, रंगनाथ अवघडे व बाबू दडस यांच्या नावावर असून त्या प्रमाणे प्रत्यक्ष वहिवाट व ७/१२ च्या

उता–यावरील क्षेत्र यांच्यात मेळ नाही असे नमूद केलेले आहे. वास्तवीक सदर नोंद कोणत्या प्रकरणातील कोणत्या आदेशाप्रमाणे झाली ही बाब स्पष्ट होत नाही. त्याचप्रमाणे क्षेत्र कमी अधिक आहे असे जरी यात नमूद केले असले तरी या क्षेत्रावर संबंधित मालकांची कब्जे वहिवाट नाही असे नमूद केलेले नाही. त्याचप्रमाणे अशा प्रकारे क्षेत्र कमी जास्त आहे म्हणून दावा मिळकतीवर प्रतिवादीचा कब्जा आहे असे अनुमान काढता येणार नाही. त्यामुळे या बाबीचा वादीच्या प्रकरणावर परिणाम होत नाही.

२७. प्रतिवादीने फेरफार क्र. २०६३ दाखल केलेला आहे. यावरुन रामू सखाराम हिरवे याचे वारस गट क्र. ५१६ ला दाखल करण्यात आलेले आहेत. परंतु रामु हिरवे याची नोंद मालकी हक्कात अथवा कब्जे वहिवाटी हक्कात नाही. ती इतर हक्काच्या रकान्यात आलेली आहे. त्यामुळे यावरुन देखील प्रतिवादीचा दावा मिळकतीवर कब्जा ठरु शकत नाही.

२८. वरीलप्रमाणे कागदपत्रांवरुन असे दिसून येते की सन १९७६ साली वादींच्या कुटुंबाच्या ताब्यात कब्जेपट्टीप्रमाणे दावा मिळकती आल्या. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या सन १९८२–१९८३ तसेच १९८४ ते १९९६ या काळातील नोंदीवरुन देखील वादींचा कब्जा कायम असल्याचे दिसून येते. आज देखिल ७/१२ च्या उता–यावरील नोंदप्रमाणे दावा मिळकतीवर वादींचाच कब्जा असल्याचे दिसून येते. त्यामुळे दावा मिळकतीवर प्रथमदर्शनी वादींचा कब्जा आहे ही बाब स्पष्ट होते. तसेच प्रतिवादी दावा मिळकतीवर आपला हक्क सांगत असल्याने तो वादींच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करतो ही बाब स्पष्ट होते. त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादींच्या लाभात आहे.

२९. वादींचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याने प्रतिवादीस वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये असा मनाई हुकूम न दिल्यास अधिक अडचणी वादींना तयार होणार आहेत. वादींना आपल्या कब्जाचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे.

३०. वादींचा दावा मिळकतीवर कब्जा असल्याने प्रतिवादीस या कब्जास हरकत अडथळा करण्यास मज्जाव न केल्यास वादीच्या ताब्यास धोका निर्माण होवून त्यांचा ताबा जावू शकतो. त्यामुळे त्यांचे पैश्याच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होणार आहे.

३१. वरीलप्रमाणे विवेचानावरुन दावा मिळकतीवर वादींचा ताबा असून प्रतिवादी त्या ताब्यास हरकत अडथळा करतो असे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र. ४ बाबत

३२. वरीलप्रमाणे विवेचनावरुन मी मुद्दा क्र. ४ करिता खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादींच्या दावा मिळकतीवरील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अथवा इतरां मार्फत दाव्याचा अंतिम निकाला लागेपर्यंत हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम प्रतिवादी विरुध्द देण्यात येतो.

दहिवडी (सं.सो.देशमुख)

दिनांक ११/०२/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दहिवडी